नि. फौ. ख. क्र. ८८/२०२०
सरकार विरुध्द लक्ष्मण डुमणे
निशाणी क्र.३९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२**

मी शपथेवर निवेदन करते की,

माझे नावः **सुप्रीया देविदास डुमणे,**
वयः **२९ वर्षे,** व्यवसायः **शिक्षण**
राहणारः **सायखेड, ता.धर्माबाद, जि.नांदेड.**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. शिखरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

मी आरोपींना ओळखते. ते आमच्या भावकीतील आहेत. फिर्यादी देविदास डुमणे हे माझे वडील आहेत. सतीश देविदास डुमणे हा माझा भाऊ आहे. आम्ही चौघी बहिणी आहोत. त्यांची नावे दिक्षा, गंगासागर व पुजा आहेत. माझ्या वडीलांचा व्यवसाय शेती असुन गट क्रमांक ८२ मौजे सायखेड येथे त्यांची १०.५ एकर शेतजमीन आहे. आमचे गट क्रमांक ८२ मधील शेतामध्ये राहते घर आहे, तेथेच आम्ही राहतो.

०२. दिनांक ३१/०७/२०२० रोजी दुपारी ०३.०० ते ०४.०० च्या दरम्यान चारही आरोपी आमच्या घरामध्ये अचानक शिरले. माझ्या वडीलांना तु शेत का पेरलेस असे म्हणुन लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केली. मारहाणीमुळे त्यांच्या डोक्यावर टेगुंळ येऊन डोळयाला आणि उजव्या पायाच्या गुडघ्याला मार लागला होता. वडीलांना मारहाण होत होती तेंव्हा आम्ही घरात होतो, माझ्यासमक्ष मारहाण केली. मी, माझया तीन बहिणी व भाऊ असे वडीलांना वाचवण्यासाठी गेलो असता आरोपींनी आम्हाला देखील लाथाबुक्या व काठींने मारहाण केली. माझ्या कपाळावर आणि डाव्या हातावर मार लागला होता. शेतातुन निघुन गेले नाहीतर तुमचा जिव काढुन टाकतो, अशा धमक्या देत त्यांनी आई–बहिणीवर शिवीगाळ केली. मारहाण व धमकी दिल्यामुळे मी घाबरुन गेले होते. आता साक्षीदाराला गुन्हयातील जप्त मुद्देमाल लाकडी काठी दाखविण्यात आली. याच काठीने आरोपी क्र.१ लक्ष्मण याने माझ्या वडीलांना कपाळावर मारले होते. ती **काठी वस्तु निशाणी–अ** वर आहे.

०३. त्यानंतर आम्ही धर्माबाद येथील पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलो.

पोलीसांनी आम्हाला सरकारी दवाखाना धर्माबाद येथे आधी पाठवले. त्यानंतर डॉक्टरांनी आमचा तेथे उपचार केला. हि मारहाण शेतीच्या वादातुन त्याच्या कब्जासाठी झाली. आरोपी नेहमीच आमच्याशी शेतीच्या कारणावरुन भांडतात.

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. के.एम.आढाव यांच्या मार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु</u>**

**०४.** माझे आता नर्सिंगचे शिक्षण सुरु आहे. आरोपी माझ्या घरात अंदाजे २.०० वाजता आले. घटना कोणत्या वाराला झाली, तो वार मला आता आठवत नाही. घटना हि दिनांक ३१ जुलै रोजी झाली आहे. हे खरे नाही की, आरोपी घरात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा गर्दा झाला नाही. हे खरे आहे की, आमच्या शेताच्या समोरुन रस्ता जातो आणि त्या रस्त्यावर रहदारी असते. माझ्या घराच्या बाजुला कोणाचेच घर नाही. शेतामध्ये आमचे एकटयांचे घर आहे. मला शेतीच्या वादाबाबत ब–याच वर्षापासुन माहिती आहे. हे खरे आहे की, आम्ही व आरोपी शेतीच्या कारणावरुन एकमेकांवर सतत कार्यवाही करतो. माझ्या वडीलांनी किती कार्यवाहया केल्या, हे मला निश्चीत माहिती नाही. हे खरे नाही की, मला शेताबदल काहीही माहित नाही, मला माझ्या वडीलांनी जे सांगितले तेच मी आज कोर्टात सांगत आहे. हे खरे आहे की, मा.उच्च न्यायालयात आमचे प्रकरण डिसमीस झाले आहे. हे खरे आहे की, त्याविरुद्ध आम्ही मा. सर्वोच्च न्यायालयात गेलो नाही. हे खरे नाही की, माझ्या आजोबांनी माझ्या वडीलांना जी शेत जमीन वाटणीत दिली होती, ती माझ्या वडीलांनी विकली होती. हे खरे नाही की, आमच्या ताब्यात व हिश्यात कुठलीही जमीन नाही, तरीदेखील आम्ही आरोपीच्या शेतावर अवैध कब्जा केला आहे. हे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रामणे कोणतीही घटना घडली नाही. हे खरे नाही की, आरोपी कधीही माझ्या घरात घुसले नाही व त्यांनी मला व माझ्या कुटुंबियाला कुठलीही मारहाण केली नाही व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली नाही. हे खरे नाही की, वडीलांच्या सांगण्याप्रमाणे खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास–नाही.** माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/–

(एस.ए.हरणे)

दिनांक: ०९.०९.२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.